
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024

लोकमत

# लंगरे यांची लंडन चर्चासत्रासाठी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



इंग्रजी आधिविभाग येथील सहयोगी प्रा. डॉ. चंद्रकांत लंगरे यांची लंडन येथे ४ ते ६ जुलैदरम्यान जोसेफ कॉनरॅड सोसायटी युके यांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली. या चर्चासत्रात 'नॉनफिक्शन ऑफ जोसेफ कॉनरॅड अॅण्ड रवींद्रनाथ टागोर ए स्टडी ऑफ नॅशनॅलिस्टीक कॉनफ्लिकट्स अॅण्ड ह्युम्यानिझम' हा शोधनिबंध सादर करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ग्योथे इन्स्टिट्यूट संस्थेतर्फे घेतलेल्या 'स्टार्ट डॉइश ए-वन' या आंतरराष्ट्रीय परीक्षेत यश मिळविले.

# 'विदेशी भाषा' विद्यार्थ्यांचे जर्मन भाषा परीक्षेत यश

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या १० विद्यार्थ्यांनी ग्योथे इन्स्टिट्यूट (मॅक्स म्युलर भवन) संस्थेतर्फे घेतलेल्या 'स्टार्ट डॉइश ए-वन' या आंतरराष्ट्रीय परीक्षेत यश मिळविले. त्यात प्रेरणा शिर्के, मृणाल कुलकर्णी, सिद्धराज माने, अनिरुद्ध पाटील, विश्वजित पाटील, सुजाता सरनाईक, निकिता पागवे, योगेश कांबळे, साक्षी पाटील, हर्षवर्धन माने यांचा समावेश आहे.

विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात विदेशी भाषांसह जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवला जातो. या अभ्यासक्रमाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमाच्या बरोबरीचा आहे. 'स्टार्ट डॉइश ए-वन' या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची विशेष तयारी करून घेण्यासाठी विभागाने विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांच्या यशात विदेशी भाषा विभागातील जर्मन भाषा शिक्षिका श्रद्धा खवरे यांचे योगदान आहे. त्यांना विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्यांना भविष्यात जर्मन भाषा क्षेत्रात करिअर संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विविध अभ्यासक्रमांचा लाभ कोल्हापुरातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024
पुण्यनगरी

# विदेशी भाषा विभाग विद्यार्थ्यांचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील 'जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या १० विद्यार्थ्यांनी नुकतेच ग्योथे इन्स्टिट्युट (मॅक्स म्युलर भवन) या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या 'स्टार्ट डॉइश अ १' ही आंतरराष्ट्रीय जर्मन भाषा परीक्षा दिली व ती उत्तीर्ण झाले.

यामध्ये प्रेरणा शिर्के, मृणाल कुलकर्णी, सिद्धराज माने, अनिरुद्ध पाटील, विश्वजीत पाटील, सुजाता सरनाईक, निकिता पागवे, योगेश कांबळे, साक्षी पाटील, हर्षवर्धन माने या विद्यार्थ्यांचा समावेश आहे, अशी माहिती डॉ. मेघा पानसरे यांनी दिली.

स्टार्ट डॉइश अ १ या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची विशेष तयारी करून घेण्यासाठी विभागाने विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांच्या या यशात विदेशी भाषा विभागातील जर्मन भाषा शिक्षिका श्रद्धा खवरे यांचे मोठे योगदान आहे. या विद्यार्थ्यांना भविष्यात जर्मन भाषा क्षेत्रात अनेक करीअर संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विविध अभ्यासक्रमांचा लाभ कोल्हापुरातील विद्यार्थ्यांनी, घ्यावा असे आवाहन पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024
पुढारी

# विदेशी भाषा विभागातील विद्यार्थ्यांचे जर्मन भाषा आंतरराष्ट्रीय परीक्षेत यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थ्यांनी जर्मन भाषा आंतरराष्ट्रीय परीक्षेत यश संपादन केले आहे.

विदेशी भाषा विभागात इतर विदेशी भाषांबरोबरच जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवला जातो. अभ्यासक्रमाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहे. अभ्यासक्रमाच्या दहा विद्यार्थ्यांनी नुकतेच ग्योथे इन्स्टिटट्यूट (मॅक्स म्युलर भवन) या संस्थेने घेतलेल्या 'स्टार्ट डॉइश A -१' या आंतरराष्ट्रीय जर्मन भाषा परीक्षेत यश मिळविले. विदेशी भाषा विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024
लोकमत

# विद्यार्थ्यांचे जर्मन भाषा परीक्षेत यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात इतर विदेशी भाषांबरोबरच जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवला जातो. विभागातील जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे १० विद्यार्थी नुकतेच ग्योथे इन्स्टिट्यूट (मॅक्स म्युलर भवन) या संस्थेतर्फे घेतलेल्या 'स्टार्ट डॉइश ए-वन' या आंतरराष्ट्रीय जर्मन भाषा परीक्षेत उत्तीर्ण झाले. यामध्ये प्रेरणा शिर्के, मृणाल कुलकर्णी, सिद्धराज माने, अनिरुद्ध पाटील, विश्वजीत पाटील, सुजाता सरनाईक, नीकिता पागवे, योगेश कांबळे, साक्षी पाटील, हर्षवर्धन माने यांचा समावेश आहे. या यशाबद्दल विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024
लोकमत

# २६ अभ्यासक्रमांसाठी २८ ला पुनर्प्रवेश परीक्षा

## शिवाजी विद्यापीठ : आजपासून अर्ज दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये २०२४-२५ साठी शैक्षणिक वर्षात २६ अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्याने या अभ्यासक्रमांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा घेण्याची वेळ विद्यापीठावर आली आहे.

येत्या २८ जूनला विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात ही परीक्षा होणार असून, यासाठी आज, बुधवारपासून प्रवेश परीक्षेचा अर्ज ऑनलाइन भरता येणार आहे. विद्यार्थ्यांना २५ जूनपर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे. २६ अभ्यासक्रमांची पुनर्प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

### दहा अभ्यासक्रमांच्या मुदत वाढवली

प्रवेश परीक्षा नसलेल्या दहा अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरण्याची मुदत ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामध्ये एम. ए. इतिहास, एम. ए. समाजशास्त्र, एम. ए. मराठी, एम. ए. हिंदी, बी. ए. स्पोर्टस, एलएल.एम., बी. कॉम. या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या विविध अभ्याक्रमांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : एम. एस्सी. फिजिक्स, केमिस्ट्री, बॉटनी अशा विविध २६ अभ्यासक्रमांसाठी शिवाजी विद्यापीठ पुनर्प्रवेश परीक्षा घेणार आहे. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये २८ जूनला परीक्षा होणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ एकाच अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा देता येणार आहे. विद्यापीठाने या अभ्यासक्रमांसाठी १६ ते १९ मे दरम्यान प्रवेश परीक्षा घेतली होती. त्यासाठी एकूण ५३८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४९०५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यानंतरही आता या अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी आता पुनर्प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत २५ जूनपर्यंत आहे. दरम्यान, प्रवेश परीक्षा नसलेल्या एम. ए. इतिहास, इंग्रजी, मराठी, हिंदी, बी.ए. फिल्म मेकिंग, बी.ए. स्पोर्टस्, एलएलएम, आदी दहा अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची मुदत ३० जूनपर्यंत वाढवली आहे. विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या सीमा भागातील विद्यार्थ्यांना विशेष सवलत मिळणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2021
सकाळ

# ऱ्हिदमिक जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षण शिबिर उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व जिल्हा जिम्नॅस्टिक असोसिएशन यांच्यावतीने आयोजित ऱ्हिदमिक जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. शिबिरात कोल्हापूरसह सांगली जिल्ह्यातील महिला खेळाडूंनी सहभाग घेतला. यात ऱ्हिदमिक जिम्नॅस्टिक्सविषयी प्रचलित नियम, कौशल्यांविषयी सखोल माहिती देण्यात आली. ही माहिती तज्ज्ञ प्रशिक्षक सई खोंड यांनी दिली. शिबिराची सांगता महाराष्ट्र जिम्नॅस्टिक्स असोसिएशनचे अध्यक्ष संजय शेटे, केएसए मानद सरचिटणीस माणिक मंडलिक, शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. के. जी. जाधव, उपाध्यक्ष प्रा. विजय रोकडे, सचिव संजय तोरस्कर यांच्या उपस्थितीत झाली. शिबिर यशस्वी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक संचालक डॉ. शरद बनसोडे, कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे यांचे सहकार्य लाभले.

19 JUN 2024
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंना रिदमिक जिम्नॅस्टिकचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हा जिम्नॅस्टिक असोसिएशन यांच्या वतीने १५ ते १७ जून या कालावधीत आयोजित रिदमिक जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षण शिबिरातून खेळाडूंनी तांत्रिक बाबी व प्रचलित नियम कौशल्य यांचे धडे घेतले. महाराष्ट्र जिम्नॅस्टिक असोसिएशनचे अध्यक्ष संजय शेटे, कोल्हापूर स्पोर्ट्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी माणिक मंडलिक यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या शिबिराच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले होते.




शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हा जिम्नॅस्टिक असोसिएशन यांच्या वतीने आयोजित रिदमिक जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षण शिबिरावेळी खेळाडूंसोबत मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रशिक्षक सई खोंड यांनी मार्गदर्शन केले. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील खेळाडूंनी रिदमिक जिम्नॅस्टिकविषयी तांत्रिक बाबी व प्रचलित नियम कौशल्ये याची माहिती जाणून घेतली. यावेळी जिम्नॅस्टिक असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रा. केजी जाधव, प्रा विजय रोकडे, संजय तोरस्कर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठातील डॉ. लंगरे यांची निवड



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लंगरे यांची लंडन (इग्लंड) येथील जोसेफ कॉनरॅड सोसायटीने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. हे चर्चासत्र ४ जुलै ते ६ जुलै दरम्यान होणार आहे. ते सदरच्या चर्चासत्रात 'नॉनफिक्शन ऑफ जोसेफ कॉनरॅड अँड रवींद्रनाथ टागोर ए स्टडी ऑफ नॅशनॅलिस्टिक कॉनफ्लिकटस् अँड ह्युम्यानिझम' हा शोधनिबंध सादर करणार आहेत. लंगरे यांनी जगप्रसिद्ध कादंबरीकार जोसेफ कॉनरॅड यांच्या कादंबरीवर आपले पीएच.डी.चे संशोधन केले आहे. त्यांना कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रभंजन माने आणि सहकारी यांचे विशेष मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.